

लोकाग्रणी लिंकन



सुरुवातीची वसाहत करणाऱ्या लोकांच्या एका कुटुंबांत लिंकनचा जन्म झाला.

ता. १२ फेब्रुवारी १८०९ रोजीं लांकडी फळ्यांच्या एका झोंपडींत अब्राहम लिंकन यांचा जन्म झाला, तेव्हां अमेरिकेचा नुकताच उदय झाला होता व तिचा विकास होत होता. वसाहत करणारे लोक अमेरिकेच्या पश्चिम भागाकडे जात होते, वसाहती करीत होते आणि नवी जमीन शोधून व संधि शोधून राष्ट्राची उभारणी करीत होते. थॉमस लिंकन हे या सुरुवातीची वसाहत करणाऱ्या लोकांपैकीं एक होते. त्यांनीं आपलें वाढतें कुटुंब प्रथम केंटकीच्या टेकड्यांतून इंडियानांत हलविलें व नंतर तें तेथून इलिनॉसमध्यें नेलें व अशा रीतीनें नव्या सरहद्दीच्या बरोबरीनें आपली आगेकूच ठेवली. हा भाग तेव्हां जंगलमय आणि ओसाड होता. तेथें जंगली प्राणी फार मोठ्या प्रमाणावर होते आणि जंगलें तोडून शेतें तयार करावीं लागत होतीं.

लिंकनच्या आई—म्हणजे पूर्वींच्या नॅन्सी हॅंक्स—यांनाहि अतिशय कष्ट करावे लागत असत. त्या प्रेमळ व धार्मिक वृत्तीच्या होत्या पण

फारशा सशक्त नव्हत्या. अब्राहम ९ वर्षांचे असतांनाच त्यांच्या मातुश्री सौ. लिंकन निधन पावल्या.

छोट्या लिंकनला शेतावरच्या जीवनाची संवय झाली होती. त्यांचा बराचसा वेळ जंगल तोडण्यांत, जमीन नांगरण्यांत, मका पेरण्यांत आणि कुंपणासाठीं खांब तोडण्यांत जाई. ते अंगापिंडानें बळकट झाले आणि त्यांचे हात व खांदेहि सशक्त झाले.

त्यांना शाळेंतील नियमित शिक्षण असें फारच थोडें मिळालें होतें—एकंदर एक वर्षभरच ते शाळेंत जाऊं शकले. पण त्यांना मोठी ज्ञान-पिपासा होती म्हणून दिवसभर काम केल्यानंतर ते वाचीत व लिहीत असत. लांकडाच्या फळीवर बेरजा करून ते स्वतःच गणित शिकत असत आणि नंतर तो मजकूर पुसून टाकीत असत. शेजाऱ्यांकडून ते वाचण्यासाठीं पुस्तकें मागून आणीत असत. नंतर अब्राहम एका मित्राला म्हणाले, "५० मैलांच्या परिघांत ज्या ज्या पुस्तकाबद्दल मी ऐकलें, तें

सरहद्दीच्या विकासाबरोबरच लहानपणीं त्यांचीहि वाढ झाली.



प्रत्येक पुस्तक मी वाचून काढलें." त्यांची सावत्र आई आणि त्यांचे वडील यांनीं त्यांच्या ज्ञानपिपासेला प्रोत्साहन दिलें.

सरहद्दीवरील या तरुणाचे विचार १९ व्या वर्षी बाहेरील जगाकडे वळले. एका सपाट बोटींतून अब्राहम लिंकन यांनीं मिसिसिपी नदींतून न्यु ऑर्लीन्स पर्यंतचा १,८०० मैलांचा प्रवास केला. इलिनॉयला परत आल्यावर त्यांनीं न्यु सालेमला जाण्याकरतां शेत सोडलें. तेथें त्यांनीं फुटकळ कामें करून निर्वाह केला. मोजणी करणें आणि दुकानांत काम करणें हीं कामें त्यांनीं केलीं व कायद्याचा अभ्यासहि केला. दुकानाच्या एका भागिदारानें दिवाळें काढलें, तेव्हां लिंकन यांनीं तें सर्वच्या सर्व मोठें कर्ज आपल्यावर घेतलें आणि त्या कर्जाची परतफेड ते पंधरा वर्षे करीत होते.

अब्राहन लिंकन नेहमींच लोकप्रिय होते. शत्रुत्व करणाऱ्या रेड इंडियन लोकांशीं लढणाऱ्या स्थानिक शिपायांनीं त्यांना आपले नेते म्हणून निवडलें

लोकांत मिळून मिसळून पुढें येण्याची लकब त्यांना होती.





नेते म्हणून त्यांचा उदय झाला आणि आपल्या राज्याच्या सर-कारांतील आपले प्रतिनिधि म्हणून लोकांनीं त्यांची निवड केली.

होतें. गोष्टी सांगण्यांत ते पटाईत होते आणि सार्वजनिक वादविवादांतहि निष्णात होते. त्यांनीं निवडणुकीला उभें राहावें असा आग्रह त्यांच्या मित्रांनीं केला.

२३ व्या वर्षी लिंकन यांनीं राज्याच्या कायदेमंडळाची निवडणूक लढविली, पण तींत त्यांना अपयश आलें. १८३४ सालीं त्यांनीं त्या-नंतरची निवडणूक लढविली आणि ती त्यांनीं जिंकली. राज्याच्या राजधानींत ते गेले, तेव्हां ते इतके गरीब होते, कीं त्यांना घोडाहि उसन-वारीनें आणावा लागला. त्यांची सारी चीजवस्त घोड्याच्या जिनावर दोन्ही बाजूला टाकलेल्या पिशव्यांत होती. त्यांना एका मित्राकडे जेवावें लागलें.

अब्राहम लिंकन यांची परिस्थिति सुधारली, तेव्हां त्यांनीं मेरी टॉड यांच्याशीं लग्न केलें. त्यांना चार मुलगे झाले, पण त्यांपैकीं एकच मुलगा मोठा होईपर्यंत जगला.

कायदेमंडळाच्या क्षेत्रांत लिंकन यांचें सामर्थ्य आणि बुद्धिमत्ता वाढली आणि लेखन व वक्तृत्व यांवर त्यांनीं प्रभुत्व मिळविलें. अल्पमतांत

असलेल्या त्यांच्या पक्षाचे विधिमंडळांतील नेते म्हणून त्यांची निवड झाली. जनतेची सामुदायिक सुज्ञता हा लोकशाहीचा पाया होय, असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या अनुभवानें हा विश्वास दृढ झाला.

चार वेळां निवडणुकींत यश मिळविल्यानंतर लिंकन यांनीं आपल्या वकिलीच्या वाढत्या कामाकडे लक्ष देण्यासाठीं कायदेमंडळाचें काम सोडलें. विशाल स्मरणशक्ति, एखाद्या गोष्टीकडे लक्ष केंद्रित करण्याचें सामर्थ्य आणि कोणत्याहि प्रश्नाच्या गाभ्याची उकल करण्याचें सामर्थ्य हे गुण अंगीं असल्यानें हुषारी, सहानुभूति व प्रामाणिकपणा यांबद्दल त्यांची ख्याति झाली.

तत्कालीन घडामोडींबद्दल लिंकन यांना आस्था वाटत होती आणि वक्ते म्हणून त्यांना सतत निमंत्रणें येत होतीं. त्याकाळीं आपले खटले चालविण्यासाठीं वकील व न्यायाधीश घोड्यावरून एका गांवाहून दुसऱ्या गांवाकडे जात असत व औचित्य आणि न्याय यांवर विचार करण्याकरितां लिंकन यांना या प्रवासांत वेळ मिळत असे. दूरगामी परिणाम करणाऱ्या

ते ग्रामीण विभागांतील वकील होते, म्हणून त्यांना विचार करण्यास वेळ मिळत असे.





गुलामगिरीच्या पद्धतींत लोकांना मालमत्ता म्हणून वागविलें जाई.

राजकीय तत्त्वज्ञानावरहि ते या प्रवासांत विचार करीत असत.

लिंकन ज्या विषयांबद्दल विचार करीत असत, त्यांपैकीं गुलामगिरी हा एक विषय होता. शंभर वर्षांपूर्वी अमेरिकेंत निम्म्या भागांत गुलामगिरी अस्तित्वांत होती, तर निम्म्या भागांतील लोक स्वतंत्र होते. आफ्रिकेहून आणलेल्या निग्रोंना दक्षिण अमेरिकेंतील शेतीप्रधान अर्थव्यवस्थेंत कमी पैशांत मिळणाऱ्या मजुरांचेंच स्थान होतें. गुलामांचा व्यापार करणाऱ्या युरोपियनांनीं या निग्रोंना पूर्वी या वसाहतींत आणलें होतें.


पण गुलामगिरीमुळें बिकट प्रश्न निर्माण झाले होते. गुलामगिरीमुळें स्वातंत्र्याचा जाहीरनामा व घटना यांचा भंग होत होता. तरीहि दक्षिण अमेरिकेंतील मळेवाले आपले गुलाम म्हणजे न्याय्य रीतीनें मिळविलेली मालमत्ताच आहे, असें मानीत होते. लिंकन यांनीं बराच वेळ बारकाईनें विचार केला आणि असा निष्कर्ष काढला, कीं "गुलामनिरी ही निश्चित-पणें अन्यायाची आहे." अमेरिकेच्या वाढत्या क्षेत्रांत गुलामगिरीचा



लिंकन यांचा वॉशिंग्टनमधील पहिला अनुभव म्हणजे काँग्रेसचें सभासदत्व.

प्रसार होऊं नये म्हणून चाललेल्या चळवळींत त्यांनीं भाग घेतला.

पश्चिमेकडील नव्या भागांत गुलामगिरी स्थिरावण्यासारख्या घटना घडूं लागल्या, तेव्हां राजकारणांत पुनः प्रवेश करणें अगत्याचें आहे, असें लिंकन यांना वाटलें. अमेरिकेच्या काँग्रेसच्या निवडणुकीस ते उभे राहिले व निवडून आले. कोलंबिया राज्यांतील गुलामगिरी नष्ट करण्याची मागणी करणारें बिल लिंकन यांनीं काँग्रेसचे सभासद म्हणून मांडलें. हें बिल त्यावेळीं पास झालें नाहीं, तरी तशाच तऱ्हेचा कायदा कांहीं वर्षांनीं करण्यांत आला.



राजकीय व्यासपीठावर ते आपल्या कल्पना कसास लावीत आहेत. "सर्वांना समान हक्क आणि स्वतंत्र भूमि," हें त्यांचें सूत्र होतें.

काँग्रेसमध्यें त्यांची मुदत संपेपर्यंत काम केल्यावर लिंकन यांनीं खाजगी वकिलीचा व्यवसाय पुनः सुरू केला. नंतर त्यांनीं रिपब्लिकन पक्ष नांवाचा नवा पक्ष स्थापन करण्यास साहाय्य केलें. १८५८ सालीं त्यांच्या पक्षानें सीनेटमधील इलिनॉयच्या जागेसाठीं आपला उमेदवार म्हणून त्यांची निवड केली. डेमॉक्रॅटिक पक्ष या दुसऱ्या महत्त्वाच्या पक्षानें आपला उमेदवार म्हणून स्टीफन ए. डग्लस यांची निवड केली. या दोघांनीं सबंध इलिनॉयमध्यें केलेल्या सात वादविवादांमुळें गुलामगिरीचा राष्ट्रीय महत्त्वाचा प्रश्न जनतेच्या मनावर चांगलाच बिंबला.

डग्लस यांनीं असें मत व्यक्त केलें, कीं आपल्याला गुलाम हवेत कीं नकोत हें ठरविण्याचा हक्क नव्या क्षेत्रांतील लोकांना असावा. लिंकन यांनीं असें सांगितलें, कीं दुसऱ्याचा मालक होण्याचा हक्क कोणासहि नाहीं. गुलामगिरी अन्याय्य असून तिचा अधिक क्षेत्रांत प्रसार होतां कामा



ज्या ठिकाणीं वादविवाद होत असत, तेथे सर्व राज्यांतून आणि आसपासच्या भागांतून लोक जमत.

नये. एवढेंच नव्हे, तर तिचा नायनाटच केला पाहिजे, असेंहि लिंकन यांनीं सांगितलें. दक्षिणेंतील गुलामांच्या मालकांबद्दल त्यांनीं सहानुभूति व्यक्त केली, आणि असेंहि सांगितलें कीं त्यांची "मालमत्ता" गेल्याबद्दल त्यांना नुकसानभरपाई मिळण्याची कांहींतरी व्यवस्था करण्यांत यावी.

या वादविवादांमुळें राष्ट्राच्या सदसद्विवेक बुद्धीला बोंचण्या लागल्या आणि अब्राहम लिंकन यांना अतिशय महत्त्व प्राप्त झालें. निवडणुकीची मोहीम संपल्यावर मतदान झालें आणि अगदीं थोड्या मताधिक्यानें डग्लस यशस्वी झाले. पण त्यापेक्षां मोठा मान लवकरच लिंकन यांना मिळणार होता—तो म्हणजे अमेरिकेचे सोळावे राष्ट्राध्यक्ष होण्याचा बहुमान.

ता. ४ मार्च १८६१ रोजीं देशाचे सोळावे अध्यक्ष म्हणून लिंकन वॉशिंग्टनला गेले. त्यावेळीं कॅपिटॉल या इमारतीचें बांधकाम पूर्ण झालें नव्हतें. आगामी बिकट काळांत राष्ट्राचें नेतृत्व करण्याकरितां म्हणून त्यांची निवड झाली होती. त्यांचे जुने प्रतिस्पर्धी डग्लस यांचा त्यांनीं यावेळीं पराभव केला होता.

गुलामगिरीच्या प्रश्नावर देशांत बरीच कटुता निर्माण झाली होती. जहालमतवादी जोरदार प्रचार करीत होते. भावनांनीं बुद्धिवाद काळवंडून टाकला होता. उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका यांच्यांत फूट पडेल अशी कित्येक दिवस वाटणारी भीति आतां खरी ठरत होती. "कॉन्फेडरेट स्टेट्स् ऑफ अमेरिका" ची स्थापना करण्यासाठीं अमेरिकेच्या संयुक्त राज्यांतून दक्षिणेकडील सात राज्यें फुटून निघालीं आणि लवकरच आणखी चार राज्यांनीं त्यांचें अनुकरण केलें. लिंकन यांनीं त्यांना फेरविचार करण्यास सांगितलें. ते म्हणाले, "यादवी युद्धाचा महत्वाचा प्रश्न जर कोणाच्या हातीं असेल, तर तो माझ्या हातीं नसून आपल्याच हातीं आहे..."

पण युद्ध ठेपलेंच. लिंकन यांचें मानवतेवर अतिशय प्रेम असलें, तरीहि चार वर्षांच्या लढ्याच्या कटु दुःखांत राष्ट्राचें नेतृत्व त्यांना करावें लागलें.

उत्तर अमेरिकेकडे अधिक चांगली सामग्री व मनुष्यबळ असलें, तरीहि कल्पक लष्करी नेत्यांच्या अभावीं सुरुवातीला तिला पराभव सहन

राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्यावर, नको असलेल्या अशा युद्धाच्या प्रश्नास राष्ट्राध्यक्षांना तोंड द्यावें लागलें.





लढा जरी अतिशय बिकट व दुर्धर होता,
तरी त्यांनीं सतत नैतिक नेतृत्व केलें.

करावे लागले. उत्तर अमेरिकेच्या सैन्यानें पश्चिमेकडील कॉन्फेडरेशनच्या सैन्याचा एक भाग युद्धापासून अलग केला, तरी दक्षिण अमेरिकेचीं सैन्यें उत्तरेकडील भागांत जोरानें शिरत होतीं.

वॉशिंग्टनमध्यें राष्ट्राध्यक्ष मोठ्या बिकट परिस्थितींतून वाट काढीत होते. विजय मिळवून देणारा लष्करी नेता ते शोधीत होते, उत्तर अमेरिकेचें ध्येय राजकीय हेतु म्हणून वापरलें जाऊं नये म्हणून दक्षता घेत होते, दक्षिण अमेरिकेविषयींच्या सूड-भावनेविरुद्ध लढा देत होते आणि लोकशाही सरकारच्या तत्त्वांचा पाठपुरावा करीत होते.

लिंकन यांचें पहिलें ध्येय अमेरिकेचीं संयुक्त राज्यें बचावणें हें होतें. १८६२ पर्यंत त्यांची खात्री झाल्याप्रमाणें गुलामांना स्वातंत्र्य देणें हें त्यांचें दुसरें ध्येय होतें. गुलामांना हळूहळू स्वातंत्र्य देणें लिंकननां अधिक पसंत होतें. पण दक्षिण अमेरिकेची त्या योजनेस संमति नव्हती.


म्हणून ता. १ जानेवारी १८६३ रोजीं लिंकन यांनीं अमेरिकेच्या

इतिहासांतील एका महान् कागदत्रावर सही केली. तो दस्तऐवज म्हणजे 'स्वातंत्र्याचा जाहीरनामा' होय. या जाहीरनाम्यानें दक्षिण अमेरिकेंतील गुलाम मुक्त झाले आणि त्यामुळें युद्धास नवें नैतिक अधिष्ठान प्राप्त झालें. हा जाहीरनामा म्हणजे मानवाच्या स्वातंत्र्य—लढ्याचा एक महत्त्वाच्या टप्पा होय. नंतर घटनेंत सुधारणा करण्यांत आली व अमेरिकेच्या सर्व भागांत गुलामगिरीस बंदी करण्यांत आली. मालकांना नंतर नुकसानभरपाई देतां येईल अशी लिंकन यांना आशा वाटत होती.

युद्धाचें पारडें फिरलें होतें. संयुक्त राज्यसंघानें समुद्रांत कोंडी केल्यानें दक्षिणेकडील राज्यांचा व्यापार खालावला होता. जमिनीवर संयुक्त राज्यसंघाच्या सैन्यानें किनाऱ्याकडे जोरदार दौड केली आणि कॉन्फेडरसीच्या सैन्याची फळी फोडली व दक्षिणेकडील सैन्यास वेढा घालण्याकरितां तें वेगानें उत्तरेकडे गेलें.

युद्धांत कामीं आलेल्यांची संख्या वाढत होती व लिंकन व्यथित अंतः-


युद्ध चालू असतांनाच—गुलामांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार झाला.




करणानें त्या लोकांच्या यादीकडे पहात होते. पण त्या दुःखांतूनच स्फूर्ति घेऊन त्यांनीं जे उद्‌गार काढले, ते उद्‌गार म्हणजे सर्व राष्ट्रांना लोकशाहीचे अभिजात ध्येय ठरले आहेत. १८६३ च्या हिंवाळ्यांत पेन्सिल्व्हानिया राज्यांतील गेटिसबर्ग येथें भाषण करतांना त्यांनीं सांगितलें, "परमेश्वराच्या कृपेनें या राष्ट्राला स्वातंत्र्याचें नवजीवन मिळेल... जनतेचें, जनतेनें निवडलेलें आणि जनतेकरितां झटणारें सरकार पृथ्वीवरून नाहींसें होणार नाहीं."

युद्ध-जर्जर झालेल्या राष्ट्रांत अखेर १८६५ सालीं शांतता प्रस्थापित झाली. राष्ट्रांत पुनः एकी झाली. पुनर्रचनेची नवी उदार योजना राष्ट्राध्यक्षांनीं आंखली. संघराज्यांत परत येणाऱ्या राज्यांना तात्काळ स्वयंशासनाची मुभा देणारी ही योजना होती. तसेंच संघराज्याशीं एकनिष्ठ असल्याची शपथ घेणाऱ्या सर्वांना क्षमा करणें, निग्रोंना नवीन परिस्थितीशीं जुळवून

दुःखांतहि—लोकशाही ध्येय





अखेर शांततेचा आणि पुनर्रचनेचा उदय झाला.

घेण्यास साहाय्य करणें आणि दक्षिणेस पुनः आर्थिक बळकटी आणण्यास मदत करणें या तरतुदीहि या योजनेंत होत्या.

उद्घाटनाच्या आपल्या दुसऱ्या भाषणांत लिंकन यांनीं आपलें मार्गदर्शक तत्त्वज्ञान असें मांडलें : "कोणाचाहि द्वेष न करतां आणि सर्वांना औदार्यानें वागवून...राष्ट्राच्या जखमा बांधण्यास झटूं या...आमच्यांत व इतर राष्ट्रांशीं असलेल्या आमच्या संबंधांत न्याय्य व चिरकालीन शांतता प्रस्थापित करण्याकरितां व तिचें पालन करण्याकरितां झटूं या."

पण आपल्या द्रष्टेपणाचीं फळें पाहण्यास लिंकन जगावयाचे नव्हते. त्यांच्या राष्ट्राध्यक्षत्वाची दुसरी मुदत सुरू झाल्यानंतर एक महिन्यानें आणि युद्ध संपल्याचें जाहीर झाल्यानंतर पांचच दिवसांनीं वॉशिंग्टन येथील एका नाट्यमंदिरांत निशाणांनीं मढविलेल्या एका बॉक्समध्यें लिंकन बसले असतां दक्षिणेकडील एका माथेफिरूनें त्यांचा खून केला.

पिस्तुलाचा बार झाला, तेव्हां सर्वांचे डोळे रंगभूमीकडे लागले होते. राष्ट्राध्यक्ष आपल्या खुर्चीत पुढें कलते होऊन पडले. त्यांचा खुनी पळून गेला, पण नंतर त्याला अटक करतांना त्यानें प्रतिबंध केल्यानें त्याला मृत्यु आला. नाट्यगृहासमोरच्याच एका घरांत राष्ट्राध्यक्षांना नेण्यांत आलें. तेथें ते रात्रभर बेशुद्धावस्थेंत होते. त्यावेळीं सारें राष्ट्र त्यांच्यासाठीं हळहळत होतें. दुसऱ्या दिवशीं शुद्धीवर येण्यापूर्वीच राष्ट्राध्यक्ष निधन पावले. एक मंत्री हळुवारपणें म्हणाले, "आतां ते अमर झाले."

लिंकन म्हणजे "उच्चत्वाप्रत गेलेला सर्वसामान्य माणूस होय" असें त्यांच्याविषयीं लिहिण्यांत आलें आहे. ते जनतेंतूनच वर आल्यानें त्यांना

"आतां ते अमर झाले."





अब्राहम लिंकन—

मानवी प्रश्न चांगले समजत असत आणि दुःखितांविषयीं त्यांना सहानुभूति वाटत असे. परमेश्वराच्या दृष्टीनें सर्व माणसें समान असून प्रत्येकाला आपलें भवितव्य घडविण्यास समान संधि मिळाली पाहिजे या तत्त्वावर त्यांची दृढ श्रद्धा होती.

लिंकन यांचा सहनशीलतेवरील विश्वास, लोकशाहीच्या विकासावरील त्यांची श्रद्धा व न्याय्य कारणासाठीं लढा देण्याची त्यांची तयारी यांनीं अमेरिकनांच्या कित्येक पिढ्यांना स्फूर्ति दिली आहे. मानवाच्या अंतिम चांगुलपणावरील लिंकन यांची श्रद्धा म्हणजे अमेरिकेच्या तत्त्वज्ञानाचा गाभाच आहे. लिंकन यांच्या अद्‌भुत जीवनाकडे पाहणें म्हणजे एका राष्ट्राच्या आत्म्याकडे जाणें व त्या आत्म्याला स्पर्श करणेंच आहे.

PRODUCED BY THE UNITED STATES INFORMATION SERVICE

9-8649